'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
मराठी साहित्य संशोधन विशेषांक Vol. 2 Issue. 3
ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2015

# रोहा तालुक्यातील 'कातकरी' आदिवासींचे लोकजीवन

**प्रा. डॉ. शंकर शिवाजी मुंडे**
मराठी विभाग प्रमुख
**डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय,**
गोवे कोलाड, ता.रोहा, जि.रायगड
महाराष्ट्र, भारत

*महाराष्ट्रात आढळणाऱ्या विविध आदिवासी जमातींपैकी 'कातकरी' ही एक आदिवासी जमात आहे. महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात प्रामुख्याने या जमातीचे अस्तित्व आढळते. कात पाडण्याचा व्यवसाय करणारी ही जमात काळानुरुप समायोजन करुन जीवन जगते आहे. त्यांच्या निवास, व्यवसाय आणि शिक्षणाच्या समस्या या इतर आदिवासींप्रमाणेच आहेत. रोहा तालुक्यातील या जमातीच्या दैनंदिन जीवनप्रणालीवर प्रस्तुत शोधनिबंधातून प्रकाश टाकण्याचा हा प्रयत्न ....*

**कातकरी जमातीचे निवासस्थान :-**

कातकरी वस्त्यांना वाडया म्हटले जाते. या वाडया डोंगरात असल्या तरी बव्हंशी मुख्य गावाला लागुन असतात. या वाडया साधारण २५-३० घरांच्या जिथे अनेक वर्षे वस्ती आहे. तिथेच ४०-५० घरे आहेत. घरे म्हणजे झोपडया. या बहुतेक कुडाच्या किंवा कारवीच्या असतात. पेंढयाने साकारलेल्या झोपडयाचा आकार लहान असतो. एकाच मोठया खोलीत कुडाची भिंत घालुन दोन वा तीन खोल्या केलेल्या आढळतात. गरिबीमुळे या घरात वस्तु अशा फारश्या नसतात. एक चुल, चार-पाच ॲल्युमिनिअमची भांडी, पितळेची भांडी, एकदोन हंडा, कळश्या हा त्यांचा आटोपशीर संसार. कातकऱ्यांची घरे पुर्वी कुडामातीची असली तरी पक्की असत. ती आकाराने मोठीही असत. पुर्वी सर्वच घरांवर भाताच्या पेंढयाचे छप्पर असे. नंतर नळयांची कौले असली. त्यानंतर मंगलौरी कौले. पायासाठी दगड वापरत आणि जोते जमिनीपासुन दोन ते तीन फुट चढवलेले असे. भिंती कुडाच्या कामटयांनी बनवत आणि नंतर त्या शेणमातीने लिंपल्या जात. दरवाजा साधारण पाच फुट उंचीचा असे. बहुतेक घरांत मधोमध कुडाची पडदी बांधुन दोन उभे भाग केलेले असत. त्यातला एक भाग स्वयंपाक घर म्हणुन तर दुसरा भाग बस-उठायला वापरला जाई. अगदी लहान झोपडी असेल तर मध्ये पडदी नसते.

RESEARCH JOURNEY

आजमितीसही कातकरी घरांची रचना बहुतांशी अशीच आहे. जे लोक स्थलांतर करतात. त्यांची घरे साध्या झोपडीसारखी असतात. घर सोडुन जाताना कुलुप लावले जाते. पण सहा-सात महिने देखभाल नसल्याने ती झोपडी मोडकळीस येते. मग तिची डागडुजी करून ती चार महिने राहण्याजोगी करण्यात येते. वाडी सोडुन जाताना झोपडी मोडुन जाण्याचाही प्रकार होतो. घराची रचना साधी असल्याने आणि त्यासाठीचे साहित्य आसपासच्या जंगलातुन मिळत असल्याने कातकरी नवरा-बायको आठ -दहा दिवस खपुन पुन्हा नवी झोपडी बनवु शकतात. बहुतेक वाडयावर उन्हाळयात असे एक तरी घर उभारले जाताना दिसते. कायमस्वरूपी असणाऱ्या घरांसमोर दिवाळी होऊन गेली कि पेंढा घालुन बांबुचा मंडप उभारतात. उन्हाळयात बरेचसे व्यवहार या मांडवाखाली पार पाडतात.

**कातकरी जमातीचे व्यवसाय :-**

हे लोक पुर्वी कात करण्याच्या व्यवसायात गुंतलेले होते. कात हा खैराच्या झाडपासुन बनवतात. खैराचे शास्त्रीय नाव ॲकेशिया कॅटेचु असे आहे. कातकरी या शब्दावरूनही हे आपल्या लक्षात येते. त्याप्रमाणे **' कातकरी '** हा प्रमाण मराठी शब्द झाला. ग्रामीण बोलीभाषेत त्यांना कातोडी, काथोडी किंवा कातवडी म्हटले जाते. हे सर्व शब्द त्यांच्या कात पाडण्याच्या उदयोगावरून पडले. बहुसंख्य कातकऱ्यांकडे गाय, बैल,म्हैस इ. जनावरे नसतात असल्याच तर शेळया आणि कोंबडया. खैराच्या झाडापासून कात बनविण्याचा प्रमुख व्यवसाय ब्रिटीश शासनाचे वनबंदी केल्यामुळे व कोकणात १९८५ नंतर या व्यवसायावर बंदी आल्यामुळे कातकरी समाजासमोर उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाला.

सध्या विटभटट्री हे त्यांच्या उपजिविकेचे मुख्य साधन आहे. त्याशिवाय भोवतालच्या परिसरात शेतमजुरी किंवा मिळेल ते काम ते शोधतात. बहुतेक कुटुंबे ही रोजगारासाठी सहा ते आठ महिने स्थलांतर करतात. त्यात विटभट्टयाबरोबरच गवतबांधणी, रेती काढणे, समुद्रातील मासेमारी, ऊसतोडणी. मराठवाडयात बाभळीपासुन कोळसा पाडणे इ.मार्ग अवलंबले जातात.

शेती हादेखील काही कातकऱ्यांचा व्यवसाय आहे. अर्थातच ज्यांच्याजवळ शेती आहे तेच शेती करतात. कातकऱ्याच्या शेतीचे स्वरूप वैशिष्टयपूर्ण असे आहे. डोंगरउताराववरची झाडे तोडून जाळणे व त्या तुकडयावर बी पेरणे याला दळ करणे अथवा दळी म्हटले जाते. संस्कृतमध्ये दळह म्हणजे पृथ्वी या शब्दाचा कोकणात दळी करणे हा शब्द बोलीभाषेत सर्रास वापरला जातो. दळी शेतीचे तंत्र कातकऱ्यांना त्याच्या मुळ भिल्ल मातृसमुहाकडुन मिळालेले असावे किंवा आसपासच्या इतर जमातीकडुन अशी शेती ही सगळयाच आदिम समाजाचा पारंपारिक वारसा आहे. पुर्वी कातकऱ्याचे शिकारीचे मुख्य साधन अर्थातच तीर कमान हे होते. त्यातील धनुष्य म्हणजे कमठा किंवा कमटी हे नावाप्रमाणेच बाबुंपासून बनवलेले असते. ते बनविण्याची कातकऱ्यांची पध्दत ही इतर कोणत्याही आदिवासीप्रमाणे आहे. पूर्वीपेक्षा आता शिकार कमी झालेली आहे. रायगड मधील जंगल नाना पदार्थांनी समृध्द आहे. त्यामुळे आजही कातकरी रानातील पदार्थ बाजारात आणून विकतात. त्यामध्ये आंबा, फणस, करवंद, जांभुळ, भोकर, आवळा, बोरं, शेवगा, चिंच, तोरणे, आदुरणे, उंबर इ. फळे. पळस, पिंपळ, नागवेल, आपटा, टेंभुणी, बांडगा यांची पाने , अळु, सुरण, कडुकंद, करांडे, चाई इ. कंदमुळे कुर्डु, टाकळा , तरी, वाघाटी, शेवळी, अंळीब, लालमाट, अंबाडी या पालेभाज्या. काकडी, भोपळा, कंटोली, खरशिंग, अळंबी या फळभाज्या. मध, गोंद, वेत, अंबाडी, बांबू, इ. पदार्थ तर ताडी- माडी, मोहाची फळे हे उत्तेजक द्रव्ये. जंगली पदार्थ त्यांच्या उपजिविकेचे साधन आहेत. शेतमजुरी हे कातकऱ्यांच्या उपजिविकेचे एक प्रमुख साधन आहे. कातकरी वाडया गावानजिक असल्यामुळे गाव समाजावर त्याचे अवंलबन अधिक आहे.

बरीचशी कुटुंबे ही विटभट्टया व कोळसाच्या भट्टयावर काम करण्यासाठी स्थलांतरित होतात. विट पाडणे ही कला बहुतेक कातकऱ्यांना अवगत आहे. विटभट्टी मालकांकडे वीटा पाडण्याचे काम करणारे मजुर हे बहुतेक कातकरी समाजाचे असतात. कोळसांप्रमाणेच विटांचे कामही अंगावर असते. ते एकहजारी विटांच्या प्रमाणात मोजतात. या धंदयात वीट पाडणे व वीट भाजणे असे दोन प्रकार असतात. विटभट्टया प्रामुख्याने सपाटीवर आणि गावाच्या कडेने असल्या तरी तिथले कातकऱ्याचे जगणे मात्र कोणत्याही स्थलांतरित मजुरांसारखे उघडयावर असते. वीट पाडण्याचा हा व्यवसाय सुध्दा आठ महिन्याचा असतो. त्याकाळात वीटभट्टीच्या जागी झोपडया उभारून कातकरी कुटुंबे राहतात.सध्या एक हजार विटा पाडण्याची मजुरी रोजाने साधारण २५० रूपये आहे. दोन जोडपे किंवा चार माणसे दिवसाला हजार विटा पाडतात. मात्र त्यासाठी पहाटेपासुन संध्याकाळपर्यंत काम करावे लागते. एक हजार विटा जरी म्हटले तरी हे प्रमाण ११०० विटा इतके असते. इतर धंदयाप्रमाणे इथेही आगावु पैसे देऊन बांधून घेण्याची पध्दत आहे.

**कातकरी जमातीची शैक्षणिक सद्यस्थिती व शिक्षणविषयक दृष्टिकोन :-**

बदलांच्या प्रकियेत वाढते दारिद्रय, विकासाची संथ दिशा, वाढते स्थलांतर हे सर्व प्रश्न असले तरी या सर्वावर मात करून वर उठण्याची एक धडपडसुध्दा या समाजात दिसुन येते. कातकऱ्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण अर्थातच फार कमी आहे. इतर आदिवासी समाज आता हळू-हळू शिक्षणाकडे आकर्षिले जात असले तरी या बाबतीत कातकरी समाज पिछाडीवर आहे. दुंगम भाग, दारिद्रय, पोटासाठी भटकंती, अस्थीर जीवन अशी निरनिराळी कारणे असली तरी मुख्य कातकरी समाजाला अदयाप शिक्षणाची गोडी लागलेली नाही. कातकऱ्याची स्थिती शिक्षणाबाबत अतिशय निराशाजनक आहे. शिक्षणाच्या बाबतीत कातकरी हा महाराष्ट्रातील सर्वात मागे राहिलेला समुह आहे. साक्षरतेचे आणि एकुणच शिक्षणाचे प्रमाण इतर समुहांच्या तुलनेत या आदिवासींमध्ये कमी आढळते.

शैक्षणिक बाबतीत कातकरी समाजाच्या मुख्य चार समस्या आहेत.

१. अपुरी पटनोंदणी म्हणजे शाळेत भरती न होणे.
२. अनाकर्षक शिक्षण म्हणजे शिक्षणाची गोडी न वाटणे.

३. शाळा गळती
४. जीवन जगण्यासाठी शिक्षणाची निरर्थकता.

कातकरी मुले शाळेत न जाण्यांचा अटळ परिणाम म्हणजे गळती. अर्थात अशी गळती होण्याचे प्रमुख कारण आई-वडीलांचे स्थलांतर. प्रत्येक वाडीवरची निदान ५०% कुटुंबे तरी रोजगाराच्या शोधार्थ स्थलांतर करतात.

**कातकरी जमातीच्या दृष्टीने आरक्षणाचे महत्व:-**

आदिवासी विकासासाठी आदिवासी विकास विभागाच्या अनेक योजना आहेत. त्यामधील काही योजना या खास आदिवासी समुहासाठी आहेत. बकऱ्यांचे वाटप, कौले, मासेमारी साहित्य, स्वयंपाकाची भांडी, वाडीवर पंप बसवणे, बियाणे पुरविणे , खावटी वाटप इ.

आदिवासी विकासाचा कोणताही ठाम दृष्टिकोन नसल्यामुळे या फुटकळ व तकलादु योजनांचा फारसा प्रभाव पडत नाही. आदिवासींना उपयोगी न पडणाऱ्या सर्व निरर्थक योजना थांबवून सरकारने दळी जमिनीवर उपक्रम राबवला तरी आदिवासीचा विकास झपाटयाने होईल. दळी जमिनीचा प्रश्न हा रायगड जिल्हयातील कातकऱ्यापुढचा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे. दळी जमिनीच्या संदर्भातील हा एकमेव प्रश्न नाही. त्याच्या इतर अनेक समस्यासुध्दा आहेत.

नोकरीमध्ये आदिवासीसाठी ७% आरक्षण दिले. दिले असले तरी त्यासाठी पात्रता दहावी /बारावी अशी असते आणि हे प्रमाण कातकऱ्यामध्ये अत्यल्प आहे. शिक्षणाचे एकुण प्रमाण वाढल्यामुळे पुढारलेल्या आदिवासी समाजातील मुलांनाच त्याचा लाभ मिळतो. आदिवासींचा विकास व कल्याणासाठी सरकार जे प्रयत्न करते त्याचे दोन मार्ग आहेत. एक म्हणजे घटनात्मक तरतुदी आणि दुसरा म्हणजे विकासाच्या योजना. आदिवासींना घटनात्मक म्हणजे कायदेशीर संरक्षण देण्यासाठी भारतीय राज्यघटनेला अनुसुची जोडण्यात आलेली आहे. या अनुसुचित सामील केलेल्या जमातीसाठी घटनेत विशेष तरतुदी आहेत. त्यामध्ये अनुसुचित जमातीसाठी राष्ट्रीय आयोग, शिक्षणक्षेत्रात व शासकीय सेवांमध्ये राखीव जागा, अत्याचार प्रतिबंधक कायदा, आदिवासी भागात स्वशासन, विशेष केंद्रिय योजना इ. बाबींचा समावेश होतो. राज्यपातळीवर आदिवासी साठी विशेष कायदे केलेले आहेत. त्यामध्ये मुख्यत: आदिवासीच्या जमीन हक्काचे रक्षण करण्याचे कायदे, जंगलाच्या वापरासाठी केलेल्या तरतुदी, गावठाण जमिनीचे हक्क, कुळकायदयातील तरतुदी इ. समावेश होतो.

**टीप :** प्रस्तुत शोधनिबंध हा प्राथमिक स्त्रोतांवर आधारीत असून संकलन सर्वेक्षण या संशोधन पध्दतीचा अवलंब केलेला आहे.